नियमित दिवाणी दावा क्र.७३/२०१३
शिवाप्पा वि. बापू वगैरे
CNR No. MHSI080005822013

**निशाणी क्र.३४४ वर आदेश**

०१. वादी यांनी प्रस्तूतचा अर्ज वादपत्रात दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले. वादीतर्फे विद्वान वकील यांचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रस्तुत अर्जात वादी यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.५ड अमृता अरविंद पुरात ह्या दि.३१/१२/२०२३ रोजी मयत झाल्या आहेत. प्रतिवादी क्र.५ड यांना प्रस्तावित वारस प्रतिवादी क्र.५ड–१ हेच कायदेशीर वारस आहेत. प्रतिवादी क्र.५ड यांना इतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी सदर दाव्यातील मयत प्रतिवादी क्र.५ड अमृता यांचे वारस मुदतीत दाव्यात आणत आहेत. प्रस्तूत दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे. त्यामुळे, वादी यांनी प्रतिवादी क्र.५ड अमृता अरविंद पुरात यांचे वारस अभिलेखावर आणण्यास व तदनुषंगिक दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी यांना पुरेशी संधी देऊन देखील त्यांनी प्रस्तूत अर्जास आपले म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे, प्रस्तूत अर्ज प्रतिवादींविरुध्द विना म्हणणे चालवण्यात आला आहे.

०४. वादीच्या कथनाप्रमाणे प्रस्तावित प्रतिवादी क्र.५ड–१ हे मयत प्रतिवादी क्र.५ड यांचे वारस आहेत. तसेच, प्रतिवादी क्र.५ड अमृता यांचा मृत्यूदाखल्याची छायांकित प्रत वादीने अभिलेखावर दाखल केल्याचे दिसते. त्यावरून वादीने प्रस्तूत अर्ज दाखल करणेस गैरवाजवी

विलंब केलेला दिसून येत नाही. वादीने असे कथन केले आहे की, दावा मिळकती वादी व प्रतिवादी क्र. १ ते ९ यांच्या एकत्र कुटुंबाच्या वडीलोपार्जित सामाईक मालकी व वहिवाटीच्या मिळकती आहेत. त्यामुळे, मयत प्रतिवादी क्र.५ड यांचे वारस प्रस्तूत दाव्यास आवश्यक पक्ष आहेत. त्यामुळे, वादीला प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास प्रस्तूत दाव्याचे स्वरुप बदलणार नाही.

०५. वरील कारणमिमांसेचा सारांश असा आहे की, नि.क्र.३४४ मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे –

**आदेश**

१. अर्ज निशाणी क्र.३४४ मंजुर करण्यात येतो.

२. वादीने अर्जात नमुद केलेली प्रस्तावित दुरुस्ती १४ दिवसाच्या आत करावी व दाव्याची दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Digitally signed by SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Date: 2024.04.25 12:00:11 +0530

(टी.एच. शेख)

दिनांकः २४/०४/२०२४

न्यायाधिकारी, ग्रामन्यायालय,
वैभववाडी.